# N 622

Seat No. | | | | | | | |

2022 III 16 1030 -N 622 - MARATHI (COMPOSITE) (A) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

(REVISED COURSE)

Time : 2 Hours (Pages 11) Max. Marks : 40

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

1. **(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) कोण ते लिहा ? 2

(*i*) एका खेळण्यात फार काळ न रमणारे ..........................

(*ii*) नोकरीतील बदलीही टाळणारे ..........................

लहान मूल एका खेळण्यात फार काळ रमत नाही. त्याला नावीन्याची ओढ असते. त्याच्या दृष्टीतच नवेपणाला सामोरं जाण्याचं तेज असतं. आपण वाढत्या वयाबरोबर हा तजेला हरवून बसतो आणि एकेका गोष्टीशी जखडून पडतो. नोकरीतली बदलीही आपण टाळतो. बदलीच्या गावाला जाणं, तिथला निसर्ग, माणसं न्याहाळणं, त्या प्रदेशाशी एकरूप होण्यातला आनंद घेणं, त्याला आपल्या लेखी काही महत्त्व नसतं. आपल्याला बदलायचं नसतं, म्हणूनच आपण बदली टाळतो. 'बदला'कडं पाहण्याची दृष्टी बदलण्यापासूनच आपण बदलांना स्वीकारण्याचा अभ्यास सुरू करू. डावं-उजवं जरूर तपासा; पण बदलणारच नाही, अशी एकांगी भूमिका घेऊ नका. नव्याचं स्वागत करायचा संदेश वसंतगमनाबरोबर आपण स्वीकारणार का ?

(2) 'तजेला' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. 1

(3) **स्वमत :** 3

'माणूस बदल स्वीकारण्यास तयार नसतो', हे विधान आपल्या अनुभवाच्या आधारे पटवून द्या.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **आकृती पूर्ण करा :** 2

| राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आलेल्या पक्ष्यांची नावे | → |
|---|---|
| | → |
| | → |
| | → |


पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे, तिच्या रक्षणाकडे जनतेचे लक्ष वेधावे. या सूचनेप्रमाणे सरकारने वन्य पशूंचे रक्षण करण्यासाठी नेमलेल्या समितीने या प्रश्नाचा विचार केला. प्रत्येक राज्याचे अभिप्राय मागवले. वृत्तपत्रांतून अभिप्राय मागवण्यात आले आणि अशा रीतीने अनेक पक्ष्यांची नावे राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आली. त्यात गरुड, हंस, महासारंग इ. पक्ष्यांचीही नावे होती. अनेक पक्ष्यांच्या नावांतून एक नाव निवडण्यासाठी अनेक कसोट्या लावण्यात आल्या. या कसोट्यांत मोर उत्तीर्ण झाला आणि 'राष्ट्रीय पक्षी' म्हणून त्याची निवड करण्यात आली. या कसोट्या लावताना ऐतिहासिक प्रणाली, काव्याची पार्श्वभूमी, लोकांची आवड इ. बाह्य कारणांबरोबरच रंग, शरीरसौष्ठव, कलात्मकता, कंठस्वर या पक्षी वैशिष्ट्यांचाही विचार करण्यात आला.

(2) **खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा :** 2

(*i*) पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती नाही.

(*ii*) 'मोर' हा आपला राष्ट्रीय पक्षी आहे.

(3) **आकृती पूर्ण करा :** 2




## विभाग-2 : पद्य

2. (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **खालील घटकांचे बाहेरून दिसणारे एक वैशिष्ट्य लिहा :** 2

(*i*) फणस -

(*ii*) नारळ -

केकतीला कांट्याचे वेढे।
भितरीं निपजती केवडे।
तैसे साधूचे शब्द गाढे।
परोपकारालागीं।।

फणस सर्वांगीं कांटवले।

भितरीं महा गोडीनें कोंदले।

तैसें साधुहृदय जालें।

बोधासंगें परियेसा।।

नारळ कठीण दिसे बाहेर।

भितरीं खोबरें अरुंवार।

तैसें साधूचें अंतर।

बोधें वोसंडले।।

ऐसा सद्‌गुरुशीं धरा भाव।

तो कैसा करावा उपाव।

शेखमहंमद सांगती सेव।

सभे श्रोत्यांप्रती।।

(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा : 2


केकतीला कांट्याचे वेढे।

भितरीं निपजती केवडे।

(आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) चौकटी पूर्ण करा : 2

कवीने वर्णन केलेली उन्हाची वैशिष्ट्ये



पिवळे तांबुस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर.

झाडांनी किति मुकुट घातले डोकिंस सोनेरी
कुरणावर शेतात पसरला गुलाल चौफेरी!

हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे!

सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे!

अशी अचल फुलपाखरे फुले साळिस जणु फुलती
साळीवर झोपली जणू का पाळण्यात झुलती.

झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरी उडती!

हिरे, माणके, पाचू, फुटुनी पंखचि गरगरती!

पहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा.

कुठे बुडाला पलीकडिल तो 'सोन्याचा गोळा ?'

(2) **दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** 2

हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे

झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे!

## विभाग-3 : भाषाभ्यास

3. (अ) **व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

(1) **सूचनेनुसार कृती सोडवा :** 2

(*i*) हे पेन काहीसं वजनदार आहे. (काळ ओळखा)

(*ii*) माझ्या ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाला. (भविष्यकाळ करा)

(2) **खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा :** 2

| **वाक्प्रचार** | **वाक्प्रचारांचे अर्थ** |
|---|---|
| (*i*) भुरळ घालणे | अंगावर बारीक काटा येणे. |
| (*ii*) शिरशिरी येणे | विचारमग्न होणे. |
| | आकर्षित करणे. |

**(आ) शब्दसंपत्ती :**

(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) नवनीत – [ ]

(*ii*) आई – [ ]

(2) पुढील शब्दातील अक्षरांपासून **दोन** अर्थपूर्ण शब्द तयार करा : 1

वनस्पतीपासून

**(इ)** अचूक शब्द ओळखून लिहा : 1

सुर्यप्रकाश/सूर्यप्रकास/सूर्यप्रकाश/सुर्यप्रकाष.

**(ई)** पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा : 1

| | **विरामचिन्हे** | **विरामचिन्हांची नावे** |
|---|---|---|
| (*i*) | ! | .............. |
| (*ii*) | ; | .............. |

## विभाग-4 : उपयोजित लेखन

4. (अ) **पत्रलेखन :** 4

सौरभ स्पोर्टस् सेंटर

रविवार पेठ, कर्जत.

सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य मिळण्याचे

लोकप्रिय ठिकाण

* स्पोर्टस् सेंटरतर्फे आंतरशालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन,

स्पर्धा- दिनांक 20 डिसेंबर

संपर्क - व्यवस्थापक, सौरभ स्पोर्टस् सेंटर, कर्जत

E-mail – sourabhsports@gmail.com

असलम/अफशान शेख-विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

←किंवा→

तुमच्या शाळेचा कबड्डी संघ विजयी झाल्याबद्दल संघनायकाला (कॅप्टनला) अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणतीही *एक* कृती सोडवा :** 4

(1) **गद्य आकलन :**

**खालील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल असे चार प्रश्न तयार करा :**

महात्मा फुले यांचे कार्य व्यापक होते. केवळ शाळा चालविणे एवढेच त्यांचे ध्येय नव्हते. त्यांना माणूस बदलवायचा होता. मनुष्य मागील गोष्टींचे अंधानुकरण करून चालतो. काळ सारखा बदलत असतो. विचार करून माणसानेही बदलले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. सत्य काय आहे हे शोधण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची जी तीन तत्त्वे महात्मा फुले यांनी सांगितली ती काही नवी नव्हती. पण त्यांनी पुनरुच्चार केला एवढेच.

(2) **जाहिरात**

संगणक वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

(3) **बातमीलेखन :**

पर्यावरण दिनानिमित्त तुमच्या विद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.

(4) **कथालेखन :**


खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :

एक मेंढपाळ मुलगा – मेंढ्या चरायला नेणे – गंमत करणे – 'लांडगा आला रे ..........' – शेतकरी धावून येणे – जोरजोरात मुलाचे हसणे – दुसऱ्या दिवशीही गंमत करणे – खरंच लांडगा येणे – मेंढपाळाचे ओरडणे – कोणी मदतीला न येणे – पश्चात्ताप – तात्पर्य.

(इ) **निबंधलेखन :** 4

खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंधलेखन करा :

(*i*) **वर्णनात्मक :**



(*ii*) **आत्मकथन :**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.

